# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ३२०/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. अरविंद डाया सोलंकी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (अ विभाग)**
कार्यकारी अभियंता अ विभाग यांचे कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक), कुलाबा संक्रमण शिबिर, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ०५

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (अ विभाग)**
कार्यकारी अभियंता अ विभाग यांचे कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक), कुलाबा संक्रमण शिबिर, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ०५

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०२०/M/०००१६३ प्रकरणी आयोगाने दि.१७.०८.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०६.२०१९ च्या पत्रावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, या आशयाचे उत्तर अपिलार्थींना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क द्यावे. अपील निकाली काढण्यात येत आहे."*

२. उक्त आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांनी माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि. १३.०९.२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. ०१.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (अ विभाग), कार्यकारी अभियंता अ विभाग यांचे कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक), मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (अ विभाग), कार्यकारी अभियंता अ विभाग यांचे कार्यालय, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक), मुंबई यांच्याकडून आयोगास दि. २२.०६.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे लेखी निवेदन दि. ०६.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, दि. २५.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांचे पत्र दि. २४.०६.२०१९ रोजीच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाने आदेशित केल्याप्रमाणे तक्रारकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०८.२०२१ रोजीची प्रत आयोगास सादर केली.

..२/-

४. तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, त्यांना दि. २५.०८.२०२१ रोजीच्या पत्राची प्रत अप्राप्त आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०८.२०२१ रोजीच्या पत्राची प्रत तक्रारकर्ता यांना उपलब्ध करुन दिली व तक्रारकर्ता यांनी ती स्विकारली.

५. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★ सत्यमेव जयते

प्रदीप व्यास 8-4-2026

**मुंबई**
**दिनांक : ०८.०४.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**